# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

**मुख्य कार्यालय** : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ,
अशोक नगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-६९०६७९००, ६९०६७९१८
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


जा.क्र. झोपुप्रा/तां-१/भोप्र/मा.क्र.१५२/३e२-४/२०२६ दि.१२/०२/२०२६.

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र (पुनर्वसन इमारत)

वाचा -१) सुधारित बांधकाम परवानगी क्र.७३६/२०२५, दि. १३/०३/२०२५.
२) वास्तुविशारद यांचे इमारत पुर्णत्व प्रमाणपत्र दि. २७/०६/२०२५
३) Design Werkz Engg. Pvt. Ltd.यांचे स्ट्रक्चरल स्टेबिलीटी व पूर्णत्वाचा दाखला दि.१५/१२/२०२५
४) वास्तुविशारद राहूल माळवदकर यांचे अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत दि.२७/०६/२०२५ रोजीचे पत्र.

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे **पेठ घोरपडे, फायनल प्लॉट क्र. १६२, लोहियानगर, पुणे** येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून क्र.झोपुप्रा/तां.१/७३६/२०२५, दि. १३/०३/२०२५ अन्वये सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. योजनेतील १०८ सदनिका + Refugee Area + सोसायटी ऑफिस + टॉयलेट + बालवाडी + वेलफेअर सेंटर + पार्किंग साठी दि.२८/०५/२०१८ रोजी अंशत: भोगवटा पत्र अदा करण्यात आले आहे. उपरोक्त वाचा २ नुसार वास्तुविशारद यांनी दि. २७/०६/२०२५ रोजी इमारत पुर्ण झालेपोटी पुर्णत्वाचा दाखला दिला आहे. तसेच वाचा ३ नुसार Design Werkz Engg. Pvt. Ltd. यांनी दि. १५/१२/२०२५ रोजी स्ट्रक्चरल स्टेबिलीटी व पूर्णत्वाचा दाखला दिला आहे.

सुधारित बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीमधील २ दुकानांचे काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीसाठी अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याबाबत वास्तुविशारद राहूल माळवदकर यांनी उपरोक्त वाचा ४ मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केला आहे. योजनेच्या वास्तूविशारद यांनी इमारत बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणित केले असल्याने, खालीलप्रमाणे बांधकामास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यतेनुसार अंतिम भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे देणेत येत आहे.

पुनर्वसन इमारत - २ दुकाने

| अ.क्र. | मजले | (Rehab) मंजूर नकाशानुसार तपशील पुनर्वसन घटक गाळे | अंतिम भोगवटा प्रमाणपत्र द्यावयाच्या एकूण दुकानांचा तपशील |
|---|---|---|---|
| १) | ग्राउंड फ्लोअर | PARKING + २ दुकान गाळे + १ सोसायटी ऑफिस + मीटर रुम + १ टॉयलेट + १ बालवाडी | २ दुकान गाळे + मीटर रुम |
| एकूण | | PARKING + २ दुकान गाळे + १ सोसायटी ऑफिस + मीटर रुम + १ टॉयलेट + १ बालवाडी | २ दुकान गाळे + मीटर रुम |

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी:-

१) प्रस्तुत अंतिम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) अंतिम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले अंतिम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) अंतिम फायर NOC जा.क्र.FB/१२८३ दि.२६/०६/२०२५ राजीचे अग्निशमन विभागाकडील अंतिम ना- हरकत प्रमाणपत्रामधील सर्व अटी व शर्ती विकासक यांच्यावर बंधनकारक राहतील.

६) लिफ्टस, Fire hydrant, Generator backup system व Water pumping इ.बाबत विकसकाने त्यांच्या खर्चाने ५ वर्षाकरिता वार्षिक देखभाल करार (AMC) करणे बंधनकारक राहील.

७) अंतिम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची, खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

८) परवाना धारक व्यक्तीद्वारे पुणे महानगरपालिका यांचे प्रस्थापित नियमाप्रमाणे ड्रेनेजचे संपूर्ण काम पूर्ण करण्यात आलेले असून ते सुरळीत सुरु आहे. यापुढे त्यामध्ये काही अडचण निर्माण झाल्यास त्याच्या दुरुस्तीची व ते नेहमी करता कार्यरत राहील यांची संपूर्ण जबाबदारी आमची राहील त्या करिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कोणतीही तोसीस आम्ही लागू देणार नाही. सदर बाबत विकसक यांनी दि.२७/१२/२०२५ रोजी हमिपत्राद्वारे लिहून देत आहे.

९) केदारनाथ एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांच्या सभासदांनी दि. २६/१२/२०२५ रोजीच्या पत्रानुसार रस्त्याबाबत कोणतीही हरकत नसल्याचे तसेच योजनेमध्ये आम्हाला पूर्णत: सुखसुविधा दिले असल्याने कोणतीही तक्रार नसल्याचे कळविले आहे.

१०) झोपडपट्टी पुनर्वसन इमारतीच्या देखभालीबाबत :

a) सदर योजनेबाबत होणाऱ्या सामायीक सुविधापोटींच्या मासिक देखभाल शुल्क खर्चाची, मासिक वीजबिल, पाणीपट्टी, सरकारी कर, पट्टे इत्यादी भरण्याची व परिसर स्वच्छतेबाबतची सर्वस्वी जबाबदारी सदर योजनेसंदर्भात स्थापित झालेल्या/होणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थेची असेल.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

b) पात्र लाभार्थींना हस्तांतरीत करण्यात येणा-या वैयक्तिक सदनिकेच्या आतील भागासंदर्भातील सर्व कर/शुल्क, विजबिल, पाणीपट्टी इत्यादी देण्याची जबाबदारी ही संबंधित लाभार्थ्यावर राहील.

११) योजनेकरीता पायाभूत सुविधा शुल्क व पुनर्वसन इमारतीसाठीचा देखभाल शुल्क हिशोबीत केलेप्रमाणे रक्कम रु. ५५,३९,५३६/- विकसक यांचे मार्फत सदर रकमेचा भरणा करणेत आला आहे. तसेच सुधारित बांधकाम परवानगी नुसार उर्वरित रक्कम पुढील टप्प्यातील टी.डी.आर. मागणी पूर्वी भरणे विकसकावर बंधनकारक आहे.

१२) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील खुली जागा आणि सार्वजनिक सुविधा सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

{ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या
दि. २९/०१/२०२६ रोजीच्या मान्यतेनुसार }

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

**सहायक संचालक, नगर रचना**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**प्रत :-१) विकसक मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि.,** १०१/१६, कर्वे रोड, पुणे-४११००४.

**२) आर्कि.श्री राहुल माळवदकर** स.नं. ६७२/६७३ प्लॉट १०, लोकेश सोसायटी, समर्थ बिल्डिंग, बिबवेवाडी पुणे ३७.

**३) सहायक निबंधक,** झोपुप्रा, पुणे.

**४) संगणक अधिकारी, झोपुप्रा,पुणे.** यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित